# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## मा. ब प्रभाग समिती
## विशेष सभा
## सभावृत्तांत

दिनांक –२७/०४/२०१८

वेळ : स. ११.१५

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ब प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची विशेषसभा शुक्रवार दिनांक २७/०४/२०१८ रोजी स.११.१५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात, मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचे मार्फत नेमणूक केलेले पीठासीन अधिकारी श्री.अशोक काकडे (भा.प्र.से) मुख्य अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण, आगरकर नगर, पुणे ४११००१ यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
२. मा. भोंडवे संगिता राजेंद्र
३. मा.ढाके नामदेव जनार्दन
४. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
५. मा.करूणा शेखर चिंचवडे
६. मा.चिंचवडे सचिन बाजीराव
७. मा.भोईर सुरेश शिवाजी
८. मा.गावडे राजेंद्र तानाजी
९. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय श्री. संदिप खोत, प्र. क्षेत्रीय अधिकारीतथा प्रशासन अधिकारी तथा सचिव,ब प्रभाग समिती कार्यालय, हे उपस्थित होते.

-------

पीठासीन अधिकारी

सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. **ब प्रभाग समितीच्या** सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सुचना करतो.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा )**

मा. ब प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण ३(तीन) नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा. करूणा शेखर चिंचवडे | मा. भोईर सुरेश शिवाजी | मा. गावडे राजेंद्र तानाजी |
| २ | मा. करूणा शेखर चिंचवडे | मा. माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई | मा. भोंडवे संगिता राजेंद्र |
| ३ | मा. करूणा शेखर चिंचवडे | मा. ढाके नामदेव जनार्दन | मा. बाळासाहेब नामदेव ओव्हाळ |

( प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेले एकूण ३(तीन) नामनिर्देशन पत्र मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले. मा. पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

पीठासीन अधिकारी

मा. ब प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त एका उमेदवाराचे ३ (तीन) नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असुन त्यामध्ये मा. ब प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. करूणा शेखर चिंचवडे हया एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. उमेदवारी अर्जमागे घेण्यासाठी सकाळी ११.२० ते ११.३५ याप्रमाणे वेळ देणेत आलेली होती. दिलेल्या वेळेत उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही.

मा. ब प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. करूणा शेखर चिंचवडे हया एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती, यांची निवडणूक घेणे ), नियम २००७ मधील नियम ६ नुसार मा. करूणा शेखर चिंचवडे यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ब प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

Ashokkakade

**अशोक काकडे (भा.प्र.से)**
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माणविकास प्राधिकरण,
आगरकर नगर, पुणे ४११००१

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
## मा.ब प्रभाग समिती
## विशेष सभा

ठराव क्रमांक – १

दिनांक –२७/०४/२०१८

विषय क्रमांक – १

विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ब प्रभाग समिती सभापती पदाकरीतामा. करूणा शेखर चिंचवडे या उमेदवाराने एकूण १ (एक) नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल केले असून सदर नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये वैध ठरलेले आहे. ब प्रभाग समिती सभापती पदाकरीतामा. मा. करूणा शेखर चिंचवडे हया एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ब प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

Ashokkakade.

**अशोक काकडे (भा.प्र.से)**
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकर नगर, पुणे ४११००१

पिंपरी चिंचवडं महानगरपालिका
ब क्षेत्रीय कार्यालय, चिंचवड ३३
क्रमांक : बक्षेका/सभाशाखा//कावि/ ६९/२०१८
दिनांक :२७/०४/२०१८

**प्रशासन अधिकारी**
तथा सचिव सभा शाखा
ब प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

यानतर मा. अध्यक्ष करुणा शेखर चिंचवडे यांनी मा.प्रभाग समिती सभेचे अध्यक्षस्थान स्विकारुन सभेच्या कामकाजास सुरवात केली.

ठराव क्रमांक :- २
दिनांक :- २७/०४/२०१८
सुचक –मा.मोनाताई कुकर्णी

विषय क्रमांक :- २
विभाग :- प्रशासन
अनुमोदक – मा.सुरेश शिवाजी भोईर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ब-प्रभाग समिती सभेचा दिवस दर महिन्याचे **पहिल्या मंगळवारी** दुपारी १२.३० वाजता व सार्वजनिक सुट्टी आल्यास सुट्टीच्या दुस-या दिवशी दुपारी १२.३० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयामधील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे निश्चित करणेत येत आहे.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(करुणा शेखर चिंचवडे)
सभापती
ब प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब क्षेत्रीय कार्यालय, चिंचवड-३३.
क्रमांक : बक्षेका/सभाशाखा/२/कावि/ ६९ /२०१८
दिनांक : २७/०४/२०१८

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
ब प्रभाग समिती

प्रत :- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.